18 NOV 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सिनेट निवडणुकीत पुन्हा विकास आघाडीची बाजी

## शिवाजी विद्यापीठ : शिक्षक, विद्या परिषेदवर 'सुटा'चे वर्चस्व : शिव-शाहू आघाडीला मिळाली एक जागा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : विविध सातपैकी नोंदणीकृत पदवीधर, प्राचार्य, संस्था चालक, अभ्यास मंडळे या चार गटांतील बहुमताच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची (सिनेट) सत्ता विद्यापीठ विकास आघाडीने यंदा पुन्हा काबीज केली. अधिसभा शिक्षक, विद्यापरिषद गटात विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) वर्चस्व कायम राखले. विद्यापीठ शिक्षक गटात विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक संघटनेने (सुप्टा) बाजी मारली. नोंदणीकृत पदवीधर गटातून पहिल्यांदाच या निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या शिव-शाहू आघाडीला एक जागा मिळाली. नोंदणीकृत पदवीधर, अधिसभा शिक्षक, विद्या परिषद या गटांचा निकाल गुरुवारी जाहीर झाला. या निवडणुकीतील मतमोजणीची प्रक्रिया तब्बल ३४ तास चालली.

या निवडणुकीतील अभ्यास मंडळ, प्राचार्य आणि विद्यापीठ शिक्षक गटातील निकाल बुधवारी जाहीर झाले. त्यानंतर अन्य गटांतील मतमोजणीची प्रक्रिया गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास पूर्ण झाली. अधिसभा शिक्षक गटातील १० पैकी ८ जागा सुटाने, तर दोन जागा विकास आघाडीने मिळविल्या. या गटात सुटाचे प्रा. डी. एन. पाटील, निवासराव वरेकर, मनोज गुजर, बबन सातपुते, ज्ञानदेव काळे, प्रकाश कुंभार, तर विकास आघाडीचे प्रा. रघुनाथ ढमकले, प्रशांत खरात विजयी झाले.

सुटाचे डॉ. शिवाजी बोथीकर, शाहीन पटेल या बिनविरोध निवडून आल्या. विद्यापरिषद गटातील ८ पैकी ४ जागा सुटाने, तर दोन जागा विकास आघाडीकडे राहिल्या. सुटाचे डॉ. सुनील बनसोडे, पोपट पाटील, राजेश निमट, सुनील चव्हाण विजयी झाले. पात्र उमेदवार मिळाले नसल्याने दोन जागा रिक्त राहिल्या. नोंदणीकृत पदवीधर गटातील १० पैकी ८ जागांसाठी लढत झाली. त्यात विकास आघाडीचे ७ जागांवर उमेदवार विजयी, २ बिनविरोध निवडून आले. या गटातील विजयी उमेदवारांनी गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष केला.



शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर विद्यापीठ विकास आघाडीने यंदा पुन्हा सत्ता मिळविली. नोंदणीकृत पदवीधर आणि अन्य गटांतील विजयी उमेदवारांसमवेत विकास आघाडीचे प्रमुख डॉ. संजय डी. पाटील यांनी विजयी मुद्रा दाखवून विद्यापीठात गुरुवारी आनंद व्यक्त केला. यावेळी आघाडीच्या कोअर कमिटीतील सदस्य उपस्थित होते.

### 'सिनेट'वरील संख्याबळ असे

- विकास आघाडी : प्राचार्य (८ जागा), संस्थाचालक (५), पदवीधर (९), अभ्यासमंडळे (१८ मंडळे), अधिसभा शिक्षक (२ जागा), विद्या परिषद (२),
- सुटा : अधिसभा शिक्षक (८ जागा), विद्या परिषद (४), अभ्यासमंडळे (१० मंडळे) सुप्टा : विद्यापीठ शिक्षक (३ जागा), शिव-शाहू आघाडी : पदवीधर (१ जागा)

### आघाडीच्या यशासाठी राबलेले हात

- या निवडणुकातील विद्यापीठ विकास आघाडीच्या यशासाठी डी. आर. मोरे, क्रांतीकुमार पाटील, भैय्या माने, शुभांगी गावडे, शिवलिंग मेनकुदळे, डी. यु. पवार, जे. एफ. पाटील, धैर्यशील पाटील, अमित कुलकर्णी, संजय जाधव, विनोद पंडित, धनाजी कणसे, राजेंद्र शेजवळ, व्ही. एम. पाटील, आदींचे हात राबले.

> शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीतील सर्व संघटना, कोअर कमिटीचे प्रयत्न आणि उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या पाठबळावर सिनेटमध्ये आम्हाला वर्चस्व राखता आले. पुढील पाच वर्षांत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत अधिक गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आघाडी कार्यरत राहील.
>
> **- डॉ. संजय डी. पाटील,**
> प्रमुख, विद्यापीठ विकास आघाडी

### नोंदणीकृत पदवीधर आघाडी भारी

- नोंदणीकृत पदवीधर गटाची मतमोजणी गुरुवारी पहाटे सुरू झाली. त्यामध्ये इतर मागास प्रवर्गाच्या जागेवर अभिषेक मिठारी (८२०७ मते), अनुसूचित जातीच्या जागेवर रतन कांबळे (६९५३) आणि भटक्या व विमुक्त प्रवर्गाच्या जागेवर अमरसिंग राजपूत (मते ७५०९, सर्वजण विकास आघाडी) विजयी झाले. त्यानंतर खुल्या प्रवर्गातील मतमोजणी सुरू झाली.
- त्यामध्ये विष्णू खाडे यांनी सर्वप्रथम कोटा पूर्ण केला. त्यानंतर अमित जाधव यांनी आवश्यक मतांचा कोटा पूर्ण केला. उर्वरित तीन जागांसाठीची मतमोजणी सायंकाळी ७ पर्यंत चालली. त्यात खाडे, जाधव, अजित पाटील, स्वागत परुळेकर (विकास आघाडी), श्वेता परुळेकर (शिव-शाहू आघाडी) विजयी झाल्या.

> या निवडणुकीमध्ये सुटाला घवघवीत यश मिळाले. आतापर्यंत सुटाने शिक्षकांच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सांघिक लढ्याचे यश आहे. शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी सुटा सदैव प्रयत्नशील राहील.
>
> **- डॉ. डी. एन. पाटील,**
> प्रमुख कार्यवाह, सुटा

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा आज हीरक महोत्सवी वर्धापनदिन

## उच्चशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, कोकण कृषी विद्यापीठ कुलगुरुंची प्रमुख उपस्थिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सवी वर्धापनदिन शुक्रवारी (दि. १८) साजरा करण्यात येणार आहे. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील व डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत हे मुख्य पाहुणे असणार आहेत.

तत्पूर्वी, शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता कुलगुरू यांच्यासह मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजवंदन कार्यक्रम होईल. राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सकाळी ८.४५ वाजता मुख्य कार्यक्रम होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये यांचा गौरव केला जाणार आहे. बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतीबाई पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा सन्मान केला जाणार आहे. प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. वर्धापनदिन कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

### शिवाजी विद्यापीठ गीताचे आज लोकार्पण

हिरक महोत्सवी वर्धापन दिन समारंभात शिवाजी विद्यापीठ गीताचे लोकार्पण उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याहस्ते व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

18 NOV 2022
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ हीरक महोत्सवी वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येला मुख्य प्रशासकीय इमारतीवर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई.

(छाया : पप्पू अत्तार)

18 NOV 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ अधिसभेवर विकास आघाडीचे वर्चस्व

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट), विद्या परिषद, अभ्यास मंडळांच्या निवडणुकीत विद्यापीठ विकास आघाडीने घवघवीत यश मिळवले. त्यामळे अधिसभेवर पुन्हा एकदा विकास आघाडीचेच वर्चस्व राहणार आहे. गुरुवारी मतमोजणीनंतर विजयी उमेदवारांनी एकच जल्लोष करत विजयोत्सव साजरा केला. या विजयात महत्त्वाची भूमिका आघाडीप्रमुख डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष संजय डी. पाटील, भैया माने, अमित कुलकर्णी, डॉ. डी. आर. मोरे यांची राहिली.

शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीची मतमोजणी बुधवारपासून सुरू होती, ती गुरुवारी सायंकाळी ७ वाजता पूर्ण झाली. यातील विविध गटांमध्ये विद्यापीठ विकास आघाडीने सरशी मिळवत आपले वर्चस्व पुन्हा सिद्ध केले.

नोंदणीकृत पदवीधर गटाच्या १० पैकी ९ जागा विकास आघाडीने मिळवल्या, तर १ जागा शिव-शाहू आघाडीने पटकावली. विद्या परिषदेच्या ८ पैकी ४ जागांवर विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) विजय मिळवला. यापूर्वी दोन जागा सुटाने बिनविरोध केल्या होत्या, तर २ जागा विकास आघाडीने बिनविरोध केल्या.

महाविद्यालयीन शिक्षक गटामध्ये १० जागांपैकी ६ जागांवर सुटा, तर २ जागा विकास आघाडीने मिळवल्या. २ जागांवर सुटाचे उमेदवार बिनविरोध आले.

## बिनविरोध निवडी

संस्थाचालक, प्राचार्य प्रवर्ग निवडणूक बिनविरोध झाली. त्यामध्ये पाटील अरुण भगवान, पाटील सर्जेराव रघुनाथ, पाटील वसंत मारुती, सावंत बापूसाहेब श्रीहरी, केंगार सूर्यकांत बापू, शेजवळ राजेंद्र विश्वनाथ आणि मुढेकर तेजस्वती बाजीराव यांची बिनविरोध निवड झाली, तर अनुसूचित जमाती आणि भटक्या व विमुक्त प्रवर्गाच्या जागा रिक्त राहिल्या. त्याचप्रमाणे अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सहा जागांतील खुल्या प्रवर्गाच्या चार जागांवर कुलकर्णी अमित अशोक, पाटील प्रकाश पांडुरंग, पाटील पृथ्वीराज संजय, पाटील वैभव सदाशिवराव यांची निवड झाली. महिलांसाठी राखीव जागेवर मोरे मंजिरी अजित यांची निवड झाली. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असणाऱ्या जागा रिक्त राहिल्या.



शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट), विद्या परिषद, अभ्यास मंडळांच्या निवडणुकीत विद्यापीठ विकास आघाडीने घवघवीत यश मिळवले. विजयी सदस्य छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून विजयाची खूण दाखवताना.

विद्या परिषदेवर विज्ञान व तंत्रज्ञान शाखेच्या खुल्या जागेवर निमट राजेश काशीनाथ यांची निवड झाली, तर मानव्यविद्या शाखेतील खुल्या जागेवर पाटील पोपट महादेव यांची, तर अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या जागेवर बनसोडे सुनील बापू तसेच आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्या शाखेच्या खुल्या जागेवर चव्हाण सुनील दत्तात्रय यांची निवड झाली. अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या जागेवर सपकाळे जगदीश भागवत यांची, तर वाणिज्य विद्याशाखेच्या महिला प्रवर्गाच्या जागेवर मैंदर्गी वर्षा विवेकानंद यांची बिनविरोध निवड झाली.

## डॉ. संजय पाटील यांचे कुशल संघटन

विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत सुरुवातीपासून डॉ. डी.वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील यांनी सर्वांना संघटित करण्याची सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे डॉ. पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरुवातीस अनेक जागा बिनविरोध झाल्या. आजच्या निकालानंतर सिनेटवर विकास आघाडीचे वर्चस्व सिद्ध झाले. डॉ. पाटील यांच्या कुशल संघटनामुळे पुन्हा एकदा सिनेटवर विकास आघाडीचेच वर्चस्व राहिले.

अधिसभेच्या खुल्या प्रवर्गाच्या पाच जागांच्या निवडणुकीत पाटील दत्तात्रय नीळकंठ, ढमकले रघुनाथ दिगंबर, खरात प्रशांत कृष्णराव, गुजर मनोज दशरथ आणि वरेकर निवासराव अधिकराव हे निवडून आले. भटक्या व विमुक्त प्रवर्गाच्या जागेवर काळे ज्ञानदेव साळू, अनुसूचित जाती प्रवर्गाच्या राखीव जागेवर सातपुते बबन शंकर आणि इतर मागास प्रवर्गाच्या जागेवर कुंभार प्रकाश गणपत हे थेट लढतीत विजयी झाले.

नोंदणीकृत पदवीधर मतमोजणीमध्ये चांगलीच चुरस पाहावयास मिळाली. यात इतर मागास प्रवर्गाच्या जागेवर मिठारी अभिषेक राजेंद्र, अनुसूचित जातीच्या जागेवर कांबळे रतन बापू आणि भटक्या व विमुक्त प्रवर्गाच्या जागेवर राजपूत अमरसिंग चंदरसिंग हे विजयी झाल्याचे घोषित झाले. नोंदणीकृत खुल्या प्रवर्गात खाडे विष्णू दत्तात्रय यांनी सर्वप्रथम कोटा पूर्ण केला. नंतर जाधव अमित पांडुरंग यांनी आवश्यक मतांचा कोटा पूर्ण केला. उर्वरित ३ जागांवर खाडे विष्णू दत्तात्रय, जाधव अमित पांडुरंग, परुळेकर श्वेता शिवाजीराव, पाटील अजित रघुनाथ आणि परुळेकर स्वागत गोपालकृष्ण हे निवडून आले. अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या शिक्षक जागेवर बोथीकर शिवाजी केरबा, तर महिलांसाठी राखीव जागेवर पटेल शाहीन अब्दुलअजी या बिनविरोध निवडून आलेल्या आहेत. नोंदणीकृत पदवीधरांच्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील भिसे लोभाजी तातेराव आणि महिला प्रवर्गातील पवार उषा प्रदीप या बिनविरोध निवडून आलेल्या आहेत.



**विकास आघाडीशी निगडित सर्व संघटनांचे एकत्रित प्रयत्न आणि उच्च तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या पाठबळामुळेसिनेटवर विद्यापीठ आघाडीने विजय मिळवला. पुढील पाच वर्षांत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व जिल्ह्यांत चांगल्या शैक्षणिक सुविधा मिळाव्यात यासाठी प्रयत्नशील राहू.**

**- डॉ. संजय डी. पाटील,**
अध्यक्ष, डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप

1 8 NOV 2022
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

नोंदणीकृत पदवीधर मतदार संघ विजयी उमेदवार




अधिसभा महाविद्यालयीन मतदार संघ विजयी उमेदवार






विद्या परिषद मतदार संघ विजयी उमेदवार




# शिवाजी विद्यापीठ सिनेटवर विकास आघाडीची सत्ता

## 'पदवीधर'मध्ये आघाडीचे, तर शिक्षक, विद्यापरिषदेवर 'सुटा'चे वर्चस्व

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळांसाठी चुरस व उत्साहाने झालेल्या निवडणुकीत विद्यापीठ विकास आघाडीने चौथ्यांदा बाजी मारत सिनेटवर सत्ता मिळविली. सर्वाधिक लक्षवेधी ठरलेल्या 'पदवीधर'मध्ये विकास आघाडीने नऊ जागा जिंकत वर्चस्व मिळविले. शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) विद्यापरिषदेच्या चार जागा व महाविद्यालयीन शिक्षक मतदारसंघात आठ जागा मिळवत हक्काचा 'बालेकिल्ला' शाबूत ठेवला आहे.

शिवाजी विद्यापीठ सिनेट निवडणुकीसाठी बुधवारी सकाळी आठ वाजता मतमोजणीस प्रारंभ झाला. मतमोजणी दुसऱ्या दिवशी गुरुवारी सायंकाळी सातपर्यंत तब्बल ३५ तासांनंतर संपली. बुधवारी रात्री उशिरा विद्यापरिषदेचा निकाल जाहीर झाला. यात 'सुटा'च्या उमेदवारांनी चार जागांवर विजय मिळविला.

महाविद्यालयीन शिक्षक व नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघाची मतमोजणी गुरुवारी सकाळी सुरू झाली. सकाळी नऊ वाजता विकास आघाडीचे प्रमुख डॉ. संजय डी. पाटील, भैया माने, अमित कुलकर्णी, डॉ. डी. आर. मोरे यांच्यासह विजयी उमेदवारांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. विकास आघाडीच्या समर्थकांनी गुलालाची उधळण करीत जल्लोष केला. महाविद्यालयीन शिक्षक गट मतमोजणीत 'सुटा'ने सहा जागा जिंकल्या.

अटीतटीची पदवीधर मतदारसंघाची मतमोजणी गुरुवारी सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होती. यात विकास आघाडीचे विष्णू खाडे यांनी सर्वप्रथम कोटा पूर्ण केला. त्यानंतर अमित जाधव यांनी आवश्यक मतांचा कोटा पूर्ण केला. उर्वरित तीन जागांसाठी सायंकाळी सातपर्यंत मतमोजणी सुरू होती. यात विकास आघाडीने नऊ जागा जिंकल्या. श्वेता परूळेकर या शिव-शाहू आघाडीच्या एकमेव उमेदवार निवडून आल्या. त्यानंतर कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विजयी उमेदवारांनी जल्लोष केला. शुभेच्छांचे डिजिटल फलक सगळीकडे झळकत होते.

**विद्यापरिषद मतदारसंघातील विजयी उमेदवार :** खुला प्रवर्ग : डॉ. राजेश निमट (विज्ञान, तंत्रज्ञान विद्याशाखा), खुला प्रवर्ग : डॉ. पोपट पाटील (मानव्यशास्त्र विद्याशाखा), खुला प्रवर्ग : डॉ. सुनील चव्हाण (आयडीएस विद्याशाखा), एस.सी. प्रवर्ग : डॉ. सुनील बनसोडे (मानव्यशास्त्र विद्याशाखा) हे 'सुटा' पुरस्कृत चार उमेदवार निवडून आले आहेत. भटक्या विमुक्त जाती-जमाती प्रवर्ग : डॉ. जगदीश सपकाळे (विज्ञान, तंत्रज्ञान विद्याशाखा), महिला प्रवर्ग : डॉ. वर्षा मैंदर्गी (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) हे विकास आघाडीचे दोन उमेदवार यापूर्वीच बिनविरोध झाले आहेत.

**अधिसभा महाविद्यालयीन शिक्षक मतदारसंघातील विजयी उमेदवार :** एससी प्रवर्ग : डॉ. बबन सातपुते, व्हीजेएनटी प्रवर्ग : डॉ. ज्ञानदेव काळे, ओबीसी प्रवर्ग : डॉ. प्रकाश कुंभार विजयी झाले आहेत. खुला प्रवर्ग : प्रा. डॉ. डी. एन. पाटील, डॉ. निवासराव वरेकर, डॉ. मनोज गुजर हे 'सुटा' पुरस्कृत उमेदवार विजयी झाले आहेत. यापूर्वीच एसटी प्रवर्गातून डॉ. शिवाजी बोधीकर, महिला प्रवर्गामधून डॉ. शाहीन पटेल हे 'सुटा'चे उमेदवार बिनविरोध झाले आहेत, तर विकास आघाडीचे डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. प्रशांत खरात हे खुल्या प्रवर्गातून विजयी झाले आहेत.

**नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघ विजयी उमेदवार :** अनुसूचित जाती : रतन कांबळे, भटक्या/ विमुक्त जाती-जमाती प्रवर्ग : अमरसिंह रजपूत, इतर मागास प्रवर्ग : अभिषेक मिठारी हे विजयी झाले आहेत. खुला प्रवर्ग : विष्णू खाडे, अजित पाटील, स्वागत परुळेकर, अमित जाधव हे निवडून आले आहेत. महिला प्रवर्गातून डॉ. उषा पवार, एस. टी. प्रवर्गातून संभाजी भिसे हे विकास आघाडीचे उमेदवार बिनविरोध झाले आहेत. पदवीधर मतदारसंघात विकास आघाडीने नऊ जागा जिंकत वर्चस्व मिळविले आहे. शिव-शाहू आघाडी 'सुटा'पुरस्कृत एक उमेदवार निवडून आला.

दरम्यान, संस्थाचालक व प्राचार्य प्रवर्गातून एकाही पदाची निवडणूक झाली नाही. सर्व सदस्य बिनविरोध निवडून आले. यात अरुण पाटील, सर्जेराव पाटील, वसंत पाटील, बापूसाहेब सावंत, सूर्यकांत केंगार, राजेंद्र शेजवळ आणि तेजस्विनी मुद्देकर यांची बिनविरोध निवड झाली.

अनुसूचित जमाती व भटक्या व विमुक्त प्रवर्गाच्या जागा रिक्त राहिल्या. त्याचप्रमाणे अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सहा जागांपैकी खुल्या प्रवर्गाच्या चार जागांवर अमित कुलकर्णी, प्रकाश पाटील, पृथ्वीराज पाटील, वैभव पाटील यांची निवड झाली. महिलांसाठी राखीव जागेवर मंजिरी मोरे यांची निवड झाली. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असणाऱ्या जागा रिक्त राहिल्या आहेत.

सिनेट निवडणुकीत ठरविल्याप्रमाणे सर्व घटकांच्या सहकार्याने चांगले यश मिळाले आहे. शिवाजी विद्यापीठ नॅक ए-प्लस, प्लस मानांकन आहे. नव्याने स्थापन होणाऱ्या अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या मदतीने शिवाजी विद्यापीठास जगासह देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठ बनविण्याचा प्रयत्न राहील.

\- डॉ. संजय डी. पाटील, प्रमुख, विद्यापीठ विकास आघाडी

'सुटा'च्या उमेदवारांना शिक्षक मतदारांनी खुल्या वातावरणात भरघोस मतदान केले आहे. मतदारांनी मताधिक्य वाढवून 'सुटा'वरील विश्वास दृढ केला आहे. गेल्या पाच वर्षांतील कामाची ही पोचपावती आहे.

\- डॉ. डी. एन. पाटील, प्रमुख कार्यवाह, 'सुटा'

### 'सुटा'चे प्रमुख कार्यवाह यांना विजयाचा गुलाल

अधिसभा महाविद्यालयीन शिक्षक मतदारसंघात शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) प्रमुख कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील विजयी झाले आहेत. त्यांनी खुल्या प्रवर्गातून विजयी होत ५०३ मते मिळविली आहेत. पदवीधर मतदारसंघात विद्यापीठ विकास आघाडीचे अमरसिंह राजपूत यांनी विजयाची हॅट्ट्रिक साधली आहे.

### 'सुटा'चे मताधिक्य वाढले

गेल्या सिनेट निवडणुकीत 'सुटा'च्या उमेदवारांना ५१ टक्के मतदान झाले होते. यावेळच्या निवडणुकीत ५८ टक्के मतदान झाले आहे. मागील निवडणुकीच्या तुलनेत ७ टक्के मताधिक्य वाढले आहे. विद्यापरिषद निवडणुकीत 'सुटा'च्या उमेदवारांच्या मताधिक्यात वाढ झाली आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ सिनेटवर पुन्हा विकास आघाडीच

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळांच्या झालेल्या सिनेट निवडणुकीत विद्यापीठ विकास आघाडीची सत्ता पुन्हा अबाधित राहिली आहे. पदवीधर मतदारसंघात विकास आघाडीने नऊ जागा मिळविल्या आहेत. शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाला (सुटा) विद्या परिषदेच्या चार जागा व महाविद्यालयीन शिक्षक मतदारसंघात आठ जागा मिळाल्या आहेत.

शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी बुधवारी सकाळी सुरू झालेली मतमोजणी गुरुवारी सायंकाळी सात वाजता पूर्ण झाली. यामध्ये विकास आघाडी, 'सुटा' व शिव-शाहू आघाडीत चुरस होती.

विकास आघाडीने संस्थाचालक, प्राचार्य, अभ्यास मंडळ यासह पदवीधर मतदारसंघात बहुमत मिळविले; तर 'सुटा'ने विद्या परिषद, महाविद्यालयीन शिक्षक गटात वर्चस्व कायम ठेवले आहे. 'सुटा'ने पदवीधर मतदारसंघात राबवलेल्या शिव-शाहू आघाडीच्या प्रयोगास मतदारांनी प्रतिसाद दिला नसल्याचे निकालातून स्पष्ट झाले.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा वर्धापनदिन आज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सवी वर्धापनदिन शुक्रवारी साजरा करण्यात येणार असून, यानिमित्त सकाळी आयोजित सोहळ्याला उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत उपस्थित राहणार आहेत. समारंभाचे अध्यक्षपद कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के भूषवणार असून, यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली. मान्यवरांच्या हस्ते सकाळी ८.३० वाजता ध्वजवंदन होणार आहे, तसेच यावेळी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये, आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षक यांचा सत्कार होणार आहे.

18 NOV 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाची वाटचाल 'लोकल टू ग्लोबल'

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर भरारी



**शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेला आज (ता. १८) ६० वर्षे पूर्ण होत असून, विद्यापीठ ६१ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. या सहा दशकांच्या प्रवासात विद्यापीठाची वाटचाल 'लोकल टू ग्लोबल' राहिली आहे, असे सांगत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी नव्या शैक्षणिक धोरणानंतर विद्यापीठ आणि उच्चशिक्षणात कोणते बदल होतील, याबाबत 'सकाळ'शी साधलेला संवाद.**

**- ओंकार धर्माधिकारी**

**प्रश्न : विद्यापीठाच्या सहा दशकांच्या वाटचालीकडे कसे पाहता?**

**डॉ. शिर्के :** शिवाजी विद्यापीठाची वाटचाल 'लोकल टू ग्लोबल' आहे. विद्यापीठाच्या सर्व घटकांनी नेहमीच नावीन्याचा ध्यास घेऊन काळाप्रमाणे स्वतःत बदल केले. विद्यार्थ्यांना अधिकाधिक सुविधा दिल्या. गेल्या सहा दशकांत विद्यापीठाची प्रतिमा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नक्कीच उंचावलेली आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या विकासात विद्यापीठाचे मोठे योगदान आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाच्या संधी मिळाव्यात, यासाठी विद्यापीठाची स्थापना झाली. यात छत्रपती राजाराम महाराज, डॉ. बाळकृष्ण, माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे मोठे योगदान आहे. सुरुवातीला ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे उच्चशिक्षणात प्रमाण वाढविणे, हाच मुख्य उद्देश होता. त्यानंतर संशोधनावर भर देण्यात आला. आज विद्यापीठातील संशोधनाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली.



विद्यापीठाचे विद्यार्थी अमेरिका, दक्षिण कोरियासह जगभरातील नामांकित संस्थांमध्ये संशोधक म्हणून कार्यरत आहेत. विद्यापीठाला संशोधनासाठी डीआरडीओ, रुसा, युनिसेफ, सीएसआर आदी सर्वांचाच निधी मिळाला. विद्यापीठात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरचे संशोधन प्रकल्प सुरू आहेत. विद्यापीठाच्या आजपर्यंतच्या वाटचालीत सर्व कुलगुरूंचे मोठे योगदान आहे. महाविद्यालयांनीही विद्यापीठाची कामगिरी उंचावण्यास नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली.

**प्रश्न : नव्या शैक्षणिक धोरणामुळे उच्चशिक्षणात कोणते बदल होतील? त्याचा विद्यार्थ्यांना कोणता लाभ होईल?**

**डॉ. शिर्के :** देशात कुशल मनुष्यबळ, सुजाण नागरिक तयार व्हावेत, ही गरज लक्षात घेऊन नवे शैक्षणिक धोरण बनविण्यात आले. छोट्या-छोट्या महाविद्यालयांची क्लस्टर विद्यापीठे बनवली जाणार आहेत.

पान १० वर »

# विद्यापीठाची वाटचाल 'लोकल टू ग्लोबल'

» पान १ वरून

महाविद्यालयांना स्वायत्तता देण्यात येईल. त्यामुळे संस्था, विद्यापीठे नवे व्यावसायिक अभ्यासक्रम स्थानिक गरजेनुसार बनवू शकणार आहेत. परीक्षा, मूल्यांकन, अभ्यासक्रम निर्मिती यांचे स्वातंत्र्य महाविद्यालयांना मिळेल. त्यामुळे ती खऱ्या अर्थाने स्वावलंबी होतील. विद्यापीठाची उच्चशिक्षणातील भूमिकाही या धोरणाने बदलणार आहे. विद्यापीठांमध्ये अधिक प्रमाणात संशोधनाचे काम केले जाईल. नव्या धोरणामुळे उच्चशिक्षणात खऱ्या अर्थाने सकारात्मक बदल होतील. शिवाजी विद्यापीठाने नव्या धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात केली. अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, ऑनलाईन शिक्षण या सर्वांमध्ये विद्यापीठाने आघाडी घेतली आहे. शिवाजी विद्यापीठ ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रम सुरू केला असून, त्याचा लाभ अनेकांना होत आहे.

**प्रश्न : नव्या शैक्षणिक धोरणानंतर शिवाजी विद्यापीठाचे स्वरूप कसे असेल?**

**डॉ. शिर्के :** शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत असणारी बहुतांश महाविद्यालये पुढील काही वर्षांत स्वायत्त होतील. त्यानंतर विद्यापीठाचे कामकाज कॅम्पसपुरते असेल. याचा लाभ इथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना होईल. विद्यापीठात आपण बी.एस्सी. आणि एम.एस्सी. इकॉनॉमिक्स अभ्यासक्रम सुरू केला. नॅनो सायन्स विभागातही पदवी अभ्यासक्रम सुरू झाला. आता विद्यापीठातील शैक्षणिक वातावरणाचा अनुभव हे विद्यार्थी बारावीनंतर घेतील. त्यांच्या शैक्षणिक कक्षा रुंदावण्यासाठी याचा लाभ होईल. विद्यापीठातील अधिविभागही स्वयत्त होतील. मूलभूत संशोधनासाठी विद्यापीठात अधिक संधी उपलब्ध होतील. यामुळे विद्यापीठ शैक्षणिक संकुल बनणार असून, येथील संधीचा फायदा अधिकाधिक विद्यार्थ्यांना घेता येईल. पीएच.डी. करणाऱ्या संशोधकांची विद्यापीठातील संख्याही वाढणार आहे. भविष्यात शिवाजी विद्यापीठ संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता आणि सामाजिक बांधिलकीतून चालणारे उपक्रम यात आणखी नावलौकिक मिळवेल.

1 8 NOV 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सवी वर्धापन दिन शुक्रवारी साजरा होत आहे. त्यनिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीवर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

18 NOV 2022
तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनामुळेच शिवाजी विद्यापीठ जागतिक स्पर्धेत

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा तरुण भारतशी संवाद : विद्यापीठाचे हिरकमहोत्सवी वर्ष

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे हिरक महोत्सवी वर्धापण दिन साजरा करीत असताना पश्चिम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर संशोधन व शिक्षणासाठी जाण्याची संधी मिळत आहे. माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, लोकनेते बाळासाहेब देसाई, छत्रपती राजाराम महाराज, डॉ. बाळकृष्ण यांचे मोठे योगदान आहे. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढवणे हाच मुख्य उद्देश होता. परंतू अलीकडे विद्यापीठातील संशोधनाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली आहे. सध्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरचे संशोधन प्रकल्प सुरू असून,



विद्यापीठाच्या यशस्वी घोडदौडीमध्ये अत्तापर्यंत सर्व कुलकुगुरूंचे मोठे योगदान आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या हिरकमहोत्सवी वर्षानिमित्त तरुण भारतशी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

विद्यापीठाच्या विकासासाठी प्रशासनानेही नेहमीच नाविन्याचा ध्यास डिजीटलायझेशन, झिरो पेंडन्सी, ऑनलाईन पेमेंट, ऑनलाईन शिक्षण यासारखे उपक्रम राबवले. बदलत्या काळानुसार वारंवार सकारात्मक बदल झाल्याने सहा दशकात विद्यापीठाची प्रतिमा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचावली आहे. म्हणूनच आता विद्यापीठाचे विद्यार्थी जगभरातील नामांकीत सरकारी व खासगी संस्थांमध्ये संशोधक म्हणून कार्यरत आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार कुशल मनुष्यबळ, सुजाण नागरिकांसह रोजगार निर्मिती केली जाणार आहे. महाविद्यालयांना स्वायत्तता देऊन त्यांच्या पातळीवर संशोधन,



अभ्यासक्रम, परीक्षा घेण्याचा अधिकार त्यांना दिला आहे. तसेच अनेक महाविद्यालयांचे मिळून क्लस्टर विद्यापीठ स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे विद्यापीठाची उच्च शिक्षणातील भूमिकाही या धोरणाने बदलणार आहे. मुलभूत संशोधनासाठी विद्यापीठामध्ये अधिक संधी उपलब्ध होतील. यामुळे विद्यापीठ हे शैक्षणिक संकूल बनणार असून येथील संधीचा फायदा अधिकाधिक प्रमाणात विद्यार्थ्यांना घेता येईल. पी.एच. डी करणाऱ्या संशोधकांची विद्यापीठातील संख्याही वाढणार आहे. शिवाजी विद्यापीठाने नवशैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात केली आहे.

### विद्यापीठातील जैवविविधता विद्यापीठाचा अभिमान

शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक कक्षा रुंदावताना विद्यापीठाच्या कँपसमधील जैवविविधता जपली आहे. पाण्याच्या बाबतीत नुसते विद्यापीठ स्वावलंबी झाले नसून महापुरासारख्या परिस्थिती कोल्हापूर शहरालाही पाण्याचा पुरवठा केला आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंगमुळे बारा महिने विद्यापीठ परिसरातील विहिरी व तळ्यांमध्ये पाणी असते. पाणी जिरवा, पाणी आडवामुळे पाण्याची पातळी वाढली आहे. त्यामुळे परिसरातील अनेकांच्या बोरचेही पाणी वाढले आहे. तसेच अनेक प्रकारचे पक्ष्यांनी विद्यापीठात हजेरी लावली आहे. सध्या १२५ प्रकारचे पक्षी विद्यापीठात पाहायला मिळतात. यामध्ये मोरांचे प्रमाण जास्त आहे, विद्यापीठातील जैवविविधता विद्यापीठाचा अभिमान आहे.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा आज हीरकमहोत्सवी वर्धापनदिन

- कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत प्रमुख पाहुणे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सवी वर्धापनदिन १८ रोजी सकाळी ८ वाजता साजरा होत आहे. राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील व दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय डी. सावंत उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के हे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.




सकाळी साडे आठ वाजता ध्वजारोहण करुन वर्धापनदिन कार्यक्रमाला सुरुवात होईल. यानंतर विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य-शिक्षक-प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेल्या मुले-मुली, बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतीताई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त शिक्षक व प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कार प्राप्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मान्यवर उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. कोल्हापूर, सांगली व सातारा येथील शिवाजी विद्यापीठाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, प्राचार्य व सेवकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

18 NOV 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शिवाजी विद्यापीठावर विद्युत रोषणाई

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मुख्य इमारतीवर केलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया: रियाज ट्रेनर)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 NOV 2022 तरुण भारत

# विकासात्मक नेतृत्व म्हणूनच सिनेटवर चौथ्यांदा वर्चस्व

## डॉ. संजय पाटील यांच्या कामावर विद्यापीठातील सर्व घटकांचा पुन्हा विश्वास

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

सुयोग्य नियोजन आणि तंत्रज्ञानाची कास धरत कोल्हापूरला शैक्षणिक उर्जितावस्था देण्यात डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांचा सिंहाचा वाटा आहे. शैक्षणिक क्षेत्रात अमुलाग्र बदलाचा प्रयोग आपल्या खासगी शिक्षण संस्थापुरताच मर्यादित न ठेवता तो शासकीय पातळीवरही प्रामाणिकपणे राबवण्याचा प्रयत्न संजय यांनी मागील २० वर्षात शिवाजी विद्यापीठात केला. त्यामुळेच त्यांच्या नेतृत्वाखालील सिनेट निवडणुकीतील विद्यापीठ विकास आघाडीवर चौथ्यांदा सर्वांनी विश्वास दाखवला. शिवाजी विद्यापीठ जागतिक पातळीवर नेहमीच झळकेल असा विश्वास त्यांनी विजयानंतर व्यक्त केला.

डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या माध्यमातून संजय पाटील यांनी अनेकांना शिक्षण आणि नोकरीची संधी दिली. कसबा बावड्यासह



कोल्हापुरात अमेरिका आणि इंग्लंड येथील जागतिक दर्जाच्या संस्थातील संधीची चर्चा होऊ लागली. डॉ. डी. वाय. पाटील यांनी बावड्यात लावलेले शिक्षण संस्थेचे रोपटे संजय पाटील यांनी अभिनव प्रयोगांनी वटवृक्ष केले. याप्रमाणेच शिवाजी विद्यापीठही पुढे आली पाहिजे, या हेतूने संजय यांनी २५ वर्षापूर्वी सिनेटनिवडणुकीच्या माध्यमातून विद्यापीठात वावर वाढवला. विविध अधिकार मंडळावर सत्ता स्थापन करून सरकारी विद्यापीठालाही नॅकचे 'एप्लसप्लस' मानांकन आणि संशोधकांना जागतिक पातळीवर जाण्यासाठी मदत केली. म्हणूनच 'संजय' यांच्या विकासात्मक कामावर मतदारांनी

### विद्यार्थी विकास महत्त्वाचा



विद्यापीठ विकास आघाडी नेहमीच विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांच्या विकासासाठी कार्यरत आहे. व्यवस्थापन परिषदेच्या माध्यमातून संशोधनासाठी शिष्यवृत्ती, खेळाडूंना वाढीव भत्ता, सोयी-सुविधा, क्रीडा साहित्य आदी सुविधा दिल्या. भविष्यातही विद्यार्थी विकासाला प्राधान्य देणार.

**डॉ. संजय डी. पाटील**
(अध्यक्ष, विद्यापीठ विकास आघाडी)

विश्वास टाकत सलग चारवेळा त्यांच्या नेतृत्वाखालील आघाडीला निवडून दिले.

आत्तापर्यंतचे सर्वच कुलगुरू, शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी आणि विविध अधिकार मंडळाच्या प्रयत्नामुळे विद्यापीठ राज्यात नंबर वन झाले आहे. विद्यापीठ विकास आघाडीचे अध्यक्ष संजय डी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आघाडीच्या सर्वच सदस्यांनी विद्यापीठाच्या प्रगतीच्या दृष्टिकोनातून अनेक सकारात्मक निर्णय घेतले. त्यामुळे विद्यापीठावरील सुटाची पकड हळूहळू कमी होत गेली. अलीकडे तर सुटाचे वर्चस्व असलेल्या अभ्यास मंडळे, शिक्षक आणि विद्या परिषदेतही आघाडीने शिरकाव केला. निवडणूक लागल्यापासून डी. वाय. पाटील विद्यापीठ परिवारासह सर्व शिक्षण संस्था, राष्ट्रवादी, विद्यापीठ विकास मंचच्या सदस्यांनी विजयासाठी परिश्रम घेतले. डॉ. संजय पाटील यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याबरोबर चर्चा करून अभाविप आणि विद्यापीठ विकास मंच, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस कर्मचारी यांना बरोबर घेऊन निवडणूक लढवली. सर्व संस्थाचालक एकत्र आल्याने सर्वच मंडळावर आघाडीने वर्चस्व मिळविले.

18 NOV 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठावर विकास आघाडीचे पुन्हा वर्चस्व

## डॉ. संजय डी. पाटील यांच्यासह समर्थकांचा जल्लोष : विद्या परिषद व महाविद्यालयीन शिक्षक मतदारसंघात सुटाचा विजय

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

अभ्यास मंडळे, पदवीधर यासह अनेक अधिकार मंडळांवर विकास आघाडीने बहुमत मिळवत विद्यापीठावर सलग चौथ्यांदा वर्चस्व मिळवले. तर सुटाने १० अभ्यास मंडळ, शिक्षक आणि विद्या परिषदेवर बाजी मारली. निकालानंतर विजयी उमेदवारांनी गुलालाची उधळण करीत जल्लोष केला. शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळांसाठी सोमवारी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील ३३ मतदान केंद्रांवर चुरशीने व उत्साहात ४० टक्के मतदान झाले. बुधवारी सकाळी ८ वाजता विद्यापीठातील परीक्षा भवनमध्ये मतमोजणीला सुरुवात झाली. तब्बल ३५ तासांच्या मतमोजणीनंतर अंतिम निकाल जाहीर झाला.

शिवाजी विद्यापीठातील ३० अभ्यास मंडळांपैकी १९ अभ्यास मंडळ आघाडी, १० अभ्यास मंडळ सुटा तर एक अभ्यास मंडळावर अपक्ष निवडून आले.

पान ९ पहा



**कोल्हापूर : विजयानंतर जल्लोष करताना डॉ. संजय डी. पाटील, भैय्या माने, डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. डी. आर. मोरे, संजय जाधव, अमित कुलकर्णी आदी.**

### विद्यापीठाला जागतिक पातळीवर नेणार

विद्यापीठ विकास आघाडीने विद्यापीठाची विकासात्मक कामे केल्यामुळे नॅकचे 'ए प्लस प्लस' मानांकन मिळवण्यासाठी प्रयत्न करणार. शिवाजी विद्यापीठ जागतिक पातळीवर नावारूपाला आणण्याचा मानस आहे. सिनेट निवडणुकीत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि आघाडीतील सर्व घटकांनी केलेल्या प्रयत्नांचे हे यश आहे.

**- डॉ. संजय डी. पाटील**
**(अध्यक्ष, विद्यापीठ विकास आघाडी)**

Times of India

# Vikas Aghadi retains control of SUK's senate, wins 30 seats

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji Vidyapeeth Vikas Aghadi — a forum led by educational institute operators from Kolhapur, Sangli and Satara districts — has managed to retain majority in the senate of Shivaji University, Kolhapur (SUK) by winning 30 out of 39 seats.

The senate, which is the apex decision making body of the SUK, includes members that are representatives of the principals, teachers, graduates and management of the colleges. The Vikas Aghadi has remained in majority in the senate for the last 10 years. The opposition was led by Shivaji University Teachers Association (SUTA) which this time had gathered support from the left parties and the Uddhav Thackeray's Shiv Sena.

The SUTA-led alliance won on eight out of the 10 seats of teachers collegium, while the Vikas Aghadi won the remaining two. The SUTA convenors, however, were claiming that they will win all the seats from teachers constituency and had even appealed to the Vikas Aghadi to refrain from fielding candidates.

In the graduates constituency, Vikas Aghadi won nine out of the 10 seats. In the collegiums where no direct election is held, SUTA got its representatives on four board of studies, while Vikas Aghadi got its representatives on three.